ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341


| | | |
|---|---|---|
| 23 | Pre-Primary Education And Justice For Anganwadi Workers **Prof. Mrs. Shamala R. Mane** | 110-113 |
| 24 | Effect of Family Type And Gender on Emotional Maturity Among Undergraduate Students **Prof. Pramila A. Surve, Prof. Ramesh S. Kattimani** | 114-118 |
| 25 | Consumer And Consumer Protection Act ,1986 : Issues And Challenges **Smt. Sampada S. Lavekar** | 119-123 |
| 26 | Gender Inequality In India **Prof. Shobha Sambhoji** | 124-125 |
| 27 | हिंदी साहित्य में अभिव्यक्ति स्वातंत्र्य **श्री काकासाहेब बापूसाहेब भोसले** | 126-127 |
| 28 | कन्हैयालाल माणिकलाल मुंशी के 'युधिष्ठिर' उपन्यास में प्रतिबिंबित धार्मिक एवं न्यायिक यथार्थता **देवकाते भागवत भगवान** | 128-131 |
| 29 | चित्रा मुद्गल के 'प्रतिनिधि कहानियों' में ग्राम्य और शहरी जीवन के विषमता का यथार्थ दर्शन **कांबळे श्रावण आबा** | 132-134 |
| 30 | नागार्जुन के काव्य में युगीन विषमता और सामाजिक आस्था एवं विश्वास के स्वर **लेफ्टनंट डॉ.रविंद्र पाटील** | 135-137 |
| 31 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर याची सामाजिक विकासाची मीमांसा **प्रा. डॉ. वासुदेव डोंगरदिवे** | 138-146 |
| 32 | महिला आरक्षणाचे राजकारण आणि स्त्रियांचा राजकीय सहभाग-समतेच्या संदर्भात **प्रा. सौ. सुपेकर व्ही. पी.** | 147-150 |
| 33 | 'मूलभूत हक्क आणि सामाजिक न्याय' **प्रा. सुहास निर्मले** | 151-153 |
| 34 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पुणे करार : एक चिकित्सक अभ्यास **डॉ. विनोद संभाजी सोनवणे** | 154-157 |
| 35 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान : 'स्त्री' च्या सामाजिक न्यायासाठी **डॉ. श्रीमती सिंधू जयवंत आवळे** | 158-160 |
| 36 | 'राजा राममोहन रॉय यांनी सतेप्रथेविरूध्द मिळविलेला न्याय' **प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम** | 161-164 |
| 37 | महिलांना समान न्याय व पंचायत राज्यातील त्यांचे योगदान **प्रा. भाऊसाहेब खंडू सांगळे** | 165-167 |
| 38 | पंचायतराज व्यवस्थेमधून महिला सबलीकरण : एक सामाजिक न्याय प्रक्रिया **प्रा. सचिन शंकर ओवाळ** | 168-170 |
| 39 | भारतातील लिंग आधारित भेदभाव आणि न्याय **प्रा. रावसहेब सटवा कांबळे** | 171-175 |
| 40 | हिंदू स्त्रियांचे वैवाहिक हक्क आणि न्याय'' **प्रा. रजनी कारदगे** | 176-178 |
| 41 | मानवी हक्क आणि शिक्षण **प्रा. अडसरे व्ही. बी.** | 179-181 |
| 42 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक न्याया बाबतचे विचार **प्रा. नदाफ बी. आर.** | 182-183 |
| 43 | आर्थिक कल्याण : सामाजिक न्यायाचा आधार **कुबेर दिनकर दिंडे** | 184-187 |
| 44 | विचारेमाळ झोपडपट्टीतील बालकामगार आणि सामाजिक न्याय **प्रा. कन्नाडे ममता कार्तिक** | 188-191 |
| 45 | शिवकालीन न्यायव्यवस्था **प्रा. डॉ. चंद्रकांत गिरी** | 192-195 |
| 46 | शिक्षणाचा अधिकार **प्रा. डॉ. गावडे एस. एम.** | 196-201 |
| 47 | अहमदनगर जिल्हयातील कम्युनिस्ट पक्षाचे जायकवाडी धरणग्रस्तांच्या लढयातील योगदान **प्रा. विधाटे गणेश शंकर** | 202-208 |
| 48 | पांगिरे प्रकरण (काशीबाई हणबर) **प्रा. डॉ. कोळसेकर मनोहर सुबराव** | 209-210 |
| 49 | शिक्षणाचा मुलभूत अधिकार आणि बालक हक्क धोरण **श्री अजितकुमार भिमराव पाटील** | 211-220 |
| 50 | स्त्रीः ''धर्म आणि न्याय'' **प्रा. डॉ. नंदिनी रविंद्र रणखांबे** | 221-223 |
| 51 | सामाजिक सुधारणा चळवळीचे अग्रदूत जगन्नाथ शंकरशेट **प्रा. उमेश गणेशराव जांभोरे** | 224-227 |
| 52 | जागतिकीकरण व न्यायः काही निरीक्षणे **प्रा. टी. वाय.रणदिवे** | 228-230 |

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक न्याया बाबतचे विचार

**प्रा. नदाफ बी. आर.**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताची राज्य घटना तयार करण्यासाठी घटना समिती तयार करण्यात आली त्यामध्ये अनेक विव्दान, कायदे पंडित होते. त्यापैकी एक डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे होते. घटना समिती समोर प्रमुख दोन बाबी होत्या यामध्ये देशासाठी कोणत्या शाशकीय व्यवस्थेचा स्वीकार करावयाचा व ती व्यवस्था ठरल्या नंतर त्या पद्धतीने देशाचा कारभार कसा चालवा यासाठी राज्यघटना तयार करणे. भारतीय लोकशाही साठी राज्याघटनेमध्ये भारतीय नागरिक हा केंद्रस्थानी आवश्यक असून त्यानुसार राज्यघटना तयार करणे आवश्यक आहे. तसेच भारतीय समाजातील विषमता कमी झाल्याशिवाय लोकशाही बाळकट होणार नाही. त्या दृष्टिने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले विचार मांडले तसेच मानवाला आपल्या अधिकाराचा वापर करण्यासाठी पोषक वातावरणाची निर्मिती करण्याच्या दृष्टीने त्यांनी मार्गदर्शक तत्वांची मांडणी केली. या तत्वांचा उद्देश स्पष्ट करताना म्हणाले होते कि आम्हाला राजकीय लोकशाही बरोबर आर्थिक लोकशाही प्रस्थापीत करावयाची आहे. म्हणून भारतीय लोकशाही यशस्वी होण्यासाठी त्यांचे विचार महत्वाचे आहेत. त्यांच्या मते लोकशाही मध्ये नकारात्मक अधिकार हे देखील महत्वाचे असून कायदा व प्रशासन यामध्ये सर्वांना समान वागणूक मिळाली पाहिजे. घटनेचे नैतिक दृष्ट्या सर्वांच्या कडून पालन झाले पाहिजे. आणि राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीचा पाया नसेल तर ती टिकु शकत नाही. म्हणून स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यास मान्यता देऊन ती जीवनमूल्य मानणारी लोकशाही म्हणजे सामाजिक लोलाशाही होय. स्वातंत्र्या शिवाय समता व या दोहो शिवाय बंधुभाव निर्माण होवू शतक नाही. यावरूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व भातीयांना लोकशाही व्यवस्थमध्ये मानव म्हणून सामाजिक न्याय मिळविण्याच्या दृष्टीने मांडलेले विचार हे बहुमोल आहेत......

- **जातिविषयक विचार :-** जात ही भारतीय मानवाच्या अधोगतीतील एक प्रमुख अडसर आहे. याची जाणिव झालेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सपूर्ण आयुष्य त्याविरोधात आपली वाणी व लोखणी झिजवली आणि हि जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी सतत चिंतन करून जाती विषयाचा अध्ययनात मौलिक भर घातली. भारतीय समाज व्यवस्था ही पूर्णता चातुर्वर्ण्य जाती व्यवस्थेवर आधारित आहे. म्हणून जातीला पावित्र्याचा, धर्मिक्तेचा मुलामा देणाऱ्या 'मनुस्मृति' विरुद्ध त्यांनी लढा दिला व जी व्यवस्था सामाजीक विषमतेचा पुरस्कार करते त्या व्यवस्थे कडून सामाजिक न्यायाची अपेक्षा करणे हे विसंगत आहे असे त्यांना वाटते.
- **शेती विषयक विचार :-** शेत जमिनीची खाजगी मालकी रद्द करून त्याऐवजी सामुहिक मालकी पास्थापित करावी असे त्यांचे मत होते. तसेच सामुहिक शेतीचे व्यवस्थापण करण्यासाठी शासनाने शेतीचे समान विभाजन करून ग्रामीण लोकांना शेती कुळ म्हणून कसण्यात द्यावी . शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी शासनाने सर्व अर्थपूर्ण सहाय्य करावे. शेतीचे विभाजन करताना श्रीमंत, गरीब, जात, धर्म, असा भेद करू नये जर शासनाच्या नियमाचे उलंघन झाल्यास दंडाची शिक्षा करावी. अशा प्रकारचे विचार आज देखील महत्वाचे वाटतात. आर्थिक विषमता व शेतकऱ्यांच्या आत्महत्या या समस्येवर भारताच्या शेतीचे सामुदायीकरण करणे हा त्यांचा विचार बहुमोल आहे.
- **अस्पृश्यते विषयीचे विचार :-** त्यांच्या मते हिंदू व्यक्ती जो धर्म मानतात तो धर्म नसून एक प्रकारचा कायदा आहे. म्हणून धर्म आणि समाज याची फारकत करून व्यक्ती विकासला संधी देणे योग्य आहे. खेड्यातील अश्पृश्यांची अवस्था पाहून त्यांनी आपले विचार व्यक्त करताना भारतीय खेडी म्हणजे प्रजासत्ताकाचा अवमान आहे. कारण हे प्रजासत्ताक केवळ स्पृश्यांचे असलेले सामराज्य होय. हिंदू धर्म